क्र.का.4/प्र.क्र.3047/639/05

**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे**1
**दिनांक** 13/04/2005

**विषय-** आम/ सर्वसाधारण कुलमुखत्यारपत्राचे आधारे दस्त निष्पादित करुन नोंदणी अधिका-यासमोर कबुली जबाब देण्याबाबत.

**परिपत्रक**:-

या कार्यालयाचे परिपत्रक क्र.का.4/प्र.क्र.3047/1266 ते 1697, दि.11/6/2001 अन्वये कुलमुखत्यार पत्रांचे आधारे दस्त नोंदणीबाबत विवेचन करण्यात आले आहे. या परिपत्रकातील परिच्छेद क्र. क चा उप परिच्छेद क्र.2 (पान क्र. 4) मध्ये नमूद आहे की, " विशेष अथवा आम कुलमुखत्यारनाम्याचे आधारे दस्त नोंदणीस दाखल करतेवेळी त्यात नमूद केलेली मिळकत दाखल दस्तातील मिळकतीशी जुळत असल्याची खातरजमा दुय्यम निंबधक यांनी करावी."

या सूचनेची अंमलबजावणी करताना ज्या आम मुखत्यारपत्रामध्ये मिळकतीचे वर्णन दिलेले नाही त्या कुलमुखत्यारपत्राचे बाबतीत काही दुय्यम निंबधक यांची संभ्रमावस्था झाल्यावरुन, स्पष्टीकरण करण्यात येते की,

1. आम मुखत्यार पत्राव्दारे मिळकतीचे वर्णन नमूद करुन त्या मिळकतीचे हस्तांतरणाचे अधिकार दिलेले असतील तर त्याच मिळकतीपुरता या अधिकारांचा वापर केला जात आहे, याची खातरजमा दुय्यम निंबधकांनी वरील परिपत्रकाप्रमाणे करणे आवश्यक आहे.

2. एखादया आम मुखत्यारपत्राव्दारे मालकाने मिळकतीचे वर्णन नमूद न करता त्यांच्या मालकीच्या कोणत्याही मिळकतीचे हस्तांतराचे अधिकार दिले असतील तर त्या प्रकरणामध्ये दाखल दस्तामधील मिळकत आम कुलमुखत्यारपत्रातील मिळकतीशी जुळत असल्याची खातरजमा करण्याचा प्रश्न येत नाही. मात्र दस्ताव्दारे हस्तांतरीत होणारी मिळकत कुलमुखत्यारपत्र देणा-या व्यक्तीने, मुखत्यारपत्र निष्पादित करतेसमयापासून धारण केलेली आहे याचे योग्य ते पुरावे/कुलमुखत्यारपत्रधारकाचे प्रतिज्ञापत्र घेवून खातरजमा करणे आवश्यक राहील. याशिवाय कुलमुखत्यारपत्रधारकाचे अधिकाराबाबत नोंदणी अधिनियमाचे कलम 34 (3) (क) प्रमाणे योग्य ती खातरजमा करण्यात यावी.

तरी दुय्यम निंबधक यांनी प्रत्येक आम मुखत्यारपत्राचे पूर्ण वाचन करुनच उपरोक्तपैकी कोणत्या प्रकारात ते मोडते ठरवावे व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

(सही/- व.मा.मसके)

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति**

**सर्व दुय्यम निंबधक**
(**सर्व जिल्हा निंबधक यांचेमार्फत**)